**सामनेवाला अमोल रमेश सोनटक्के यांचा शपथेवर उलटतपास अर्जदारातर्फे ॲड आर. एम. मुंगसे वकील यांचे मार्फत सुरु-**

मी बारावी पर्यंत शिकलेला आहे. विवाहाचा संपुर्ण खर्च मी केल्याबाबत मी कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे सासरे माझे लग्न होण्यापुर्वी मयत झाले. हे म्हणणे खरे आहे की, गट नं. १२२, गट नं. १२६/३ बाबत न्यायालयात दावा दाखल नाही. लग्नानंतर अर्जदार एक वर्ष चांगली नांदली. माझे व अर्जदाराचे कोणतेही वाद झाले नाहीत. अर्जदार ही मला ‘मला नोकरीवाला नवरा पाहिजे’ ही बाब कोणत्या तारखेस म्हणाली हे माझ्या लक्ष्यात नाही. हे म्हणणे खरे नाही की, दिव्याच्या नावे माझे पाथर्डी येथे वेल्डींगचे दुकान आहे. माझ्या व आईच्या नावे क्षेत्र नसुन माझ्या कुटूंबाच्या नावे तीन एकर क्षेत्र आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या क्षेत्रामध्ये बोर, सिताफळ यांच्या बागा आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आम्हाला त्यापासुन पाच लाख रुपये वार्षीक उत्पन्न मिळते. हे म्हणणे खरे नाही की, पाथर्डी शहरामध्ये आमचे प्लॉट्स आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी प्लॉट खरेदी विक्रीचा व्यवसाय करतो. माझ्या आई-वडीलांचा मी स्वत सांभाळ करतो. माझे आई-वडील आजारी आहेत. मला आई-वडीलांचा सांभाळ करण्यास दरमहा आठ ते दहा हजार खर्च येतो. मला आमचे कुटूंब चालवायला रक्कम रुपये पंधरा हजार खर्च लागतो. मी माझे आई-वडील आजारी असल्याबाबत कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे दरमहा सतत उत्पन्न रक्कम रुपये पंधरा हजार च्या वर आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला दरमहा पंधरा हजार रुपयांपेक्षा कमी अथवा जास्त रक्कम उत्पन्न मिळते. सदरचे उत्पन्न मला मजुरीतुन मिळते. दिव्या वेल्डींगचे उत्पन्न कोणी घेत नाही. हे म्हणणे खरे आहे की, गट नं. १२२ व १२६ वर अर्जदाराची वारसाने नोंद झाली. हे म्हणणे खरे आहे की, त्याचे उत्पन्न अर्जदाराची आई व भाउ घेतात. अर्जदाराला गायी, म्हशी व शेळ्या पासुन दरमहा उत्पन्न मिळत असल्याबाबत मी कागदोपत्री पुरावा न्यायालयात दाखल केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, आमचे लग्न अर्जदाराच्या माहेरी देडगाव येथे झाले. हे म्हणणे खरे नाही की, देडगाव येथील आमच्या लग्नाचा संपुर्ण खर्च अर्जदाराच्या आईने केला. हे म्हणणे खरे नाही की, लग्नानंतर मी अर्जदाराला दोन-तीन महिने बरे नांदविले व त्यानंतर तिला मारहाण चालु केली. हे म्हणणे खरे नाही की, मी, माझे, आई-वडील व भाउ असे सर्वजण अर्जदाराला मारहाण करुन माहेरहुन पैसे घेवुन ये असे म्हणुन तिला उपाशी ठेवत असे. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदाराच्या आईने आम्हाला वेळोवेळी

पैसे दिले आहेत. आम्ही घर मार्च-२०१९ मध्ये बांधले. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे घर बांधण्यासाठी आम्ही अर्जदाराला रक्कम रुपये तीन लाखची मागणी करत असे. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदाराच्या आईने स्वतचे सोने मोडुन आमच्या घरासाठी तीन लाख रुपये दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदाराला मुलगी झाली म्हणुन मी व माझ्या घरचे सर्व जण अर्जदाराला त्रास देत असत. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही परत अर्जदाराला घराचे बांधकाम पुर्ण करावयाचे आहे म्हणुन तीन लाख रुपयांची मागणी केली. हे म्हणणे खरे नाही की, मी अर्जदाराला दोन लाख रुपयांची मागणी करुन मे-२०२१ मध्ये घराबाहेर हाकलुन दिले. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदाराची आई व पाहुणे रावळे यांनी विनंती केल्या मुळे आम्ही अर्जदाराला पुन्हा नांदावयास घेवुन गेलो. हे म्हणणे खरे नाही की, २०२३ मध्ये आम्ही पुन्हा अर्जदाराला तीन लाखाची मागणी केली. हे म्हणणे खरे नाही की, मुलगी दिव्याला हिसकावुन घेवुन आम्ही अर्जदाराला घराबाहेर हाकलुन दिले. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदाराच्या आईने व पाहुण्यांनी आमच्याकडे अर्जदाराला नांदविण्यासाठी खुप विनंती केली. हे म्हणणे खरे आहे की, मी अर्जदाराच्या अन्न वस्त्र पोटगीची सोय केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझी दरमहा अर्जदाराला दहा हजार रुपये पोटगी देण्याची ऐपत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझी अर्जदाराला वीस लाख रुपये नुकसान भरपाई देण्याची ऐपत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल करुन आज रोजी खोटा जबाब देत आहे. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही विभक्त राहत असल्यापासुन अर्जदार एकटीच राहते.

**उलटतपास पुर्ण, फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृती,

PRANITA RITESH SUGAONKAR

Digitally signed by PRANITA RITESH SUGAONKAR
Date: 2025.11.07 17:15:07 +0530

दिनांक :- ०७/११/२०२५

**(डॉ.पी. आर. सुगांवकर)**
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.१, नेवासा.